**प्रेस नोट**

ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

दिनांक : ०७.०६.२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) प्रतीक श्रीधरराव गायकवाड, वय २९ वर्षे, पद : डाटा एन्ट्री ऑपरेटर (रोजंदारी कर्मचारी), कार्यालय वनपरिक्षेत्र अधिकारी, वडाळी परिक्षेत्र, अमरावती<br>२) दिलीप मुरलीधर कल्याणकर, वय ५९ वर्षे, पद : वनमजुर, कार्यालय वनपरिक्षेत्र अधिकारी, वडाळी परिक्षेत्र, अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनाक ०७/०६/२०२२ चे १२.३५ वा. ते १३.१० वा.दरम्यान |
| ४ | स्विकारलेली लाच रक्कम | ५,०००/— रुपये |
| ५ | घटनास्थळ | कार्यालय वनपरिक्षेत्र अधिकारी, वडाळी परिक्षेत्र, अमरावती |

**थोडक्यात हकिकत :** यातील तक्रारदार यांनी दिनांक ०६/०६/२०२२ रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०६/०६/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान तकारदार यांनी खरेदी करुन कटाई केलेल्या झाडांचे वाहतुकीचे परवानगीचे प्रकरणावर वनपरिक्षेत्र अधिकारी, वडाळी परिक्षेत्र, अमरावती यांची सही घेवून प्रकरण वरिष्ठ कार्यालयास पाठविणेकरीता तकारदार यांचेकडे वनपरिक्षेत्र अधिकारी, वडाळी परिक्षेत्र, अमरावती कार्यालय येथील श्री.प्रतीक गायकवाड, डाटा एंट्री ऑपरेटर व श्री.दिलीप कल्याणकर, वनमजुर यांनी ५,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक ०७/०६/२०२२ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान वनपरिक्षेत्र अधिकारी, वडाळी परिक्षेत्र, अमरावती कार्यालय डाटा एंट्री ऑपरेटर श्री.प्रतीक गायकवाड यांनी तकारदार यांचेकडून लाच रक्कम ५,०००/— रुपये स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. वरुन नमुद दोन्ही आरोपींविरुध्द पो.स्टे.फ्रेजरपुरा, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, श्री.संजय महाजन, पोलीस उपअधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पो.नि.प्रविणकुमार पाटील, पो.नि. सतीश उमरे, म.पो.हवा.माधुरी साबळे, पो.ना.विनोद कुंजाम, रोशन खंडारे, पो.कॉ.अभय वाघ, चा.स.पो.उ.नि.सतीष किटकूले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तकार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क : ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,
ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती

टोल फ्री कमांक : १०६४

दुरध्वनी कमांक : ०७२१—२५५२३५५,२५५३०५५

(प्रविणकुमार पाटील)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.नं.९८५००७०५०४

Scanned with CamScanner